# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

*शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.*

ई-मेल पत्ता :- jdhekvp@Rediffmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०


ज. क्र.सहसं/उशि/कोविप/मशि.३/विअनु/२०१२-१३/१४ |४८१ दि. ११ जुलै, २०१२

### प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सहयोग प्रतिष्ठान संचलित १०४/०१, ओझोन व्हॅली, पारसिक नगर, कळवा, ठाणे (प)-४०० ६०५ येथे शासन आदेश क्र. एनजीसी २०१२/(९१/१२)/मशि-४, दि. १५.०६.२०१२ नुसार नवीन पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालयांना मंजूरी अंतर्गत सहयोग कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, व्दारा, दूर्गा देवीपाडा, जूने अंबरनाथ रोड, जि. ठाणे-४२१ ५०१ या महाविद्यालयास विज्ञान (बी.एस्सी. इन हॉस्पिटॅलिटी स्टडीज) या विद्याशाखेच्या नवीन महाविद्यालयास सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील क्र. १ ते ७ प्रमाणे अटी व शर्तींना अनुसरुन कायम विना अनुदानित तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. शासन निर्णयातील अटी व शर्तींप्रमाणे संस्था महाविद्यालयाकडून रु. १००/- च्या भारतीय गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम/महाविद्यालय/विद्याशाखा/तुकडी/विषय चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही अनुदानाची आर्थिक मागणी केली जाणार नाही. असे हमीपत्र महाविद्यालयांकडून/संस्थेकडून दि. १५.०६.२०१२ अन्वये शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

"महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-१९९४" अंतर्गत तरतुदींनुसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश तसेच प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या विगतवारीसह नियतकालिक आढावा, नॅक ॲक्रिडीएशन बाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याच्या अधिन राहून शासन निर्णयातील सूचनांप्रमाणे विद्यापीठाने या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नवीन महाविद्यालय / विषय / तुकडी / विद्याशाखा / अभ्यासक्रमासाठी पुढील संलग्नीकरण्याची प्रक्रिया सुरु करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

B.B.Chadam

विभागीय सहसंचालक, ११/७

उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

स्थळ :- पनवेल

दिनांक :- ११ जुलै, २०१२

प्रत :-

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -३२ / एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - २० यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठांनी त्यांच्या संलग्निकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे विद्याशाखांचे विहित शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबी पूर्ण करण्याच्या सूचना, तसेच <u>बार कौंसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई / ए.आय.सी.टी.ई., नॅक यांचेकडील ना-हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना पुनश्च: उपरोक्त संस्थेच्या निदर्शनास आणून द्याव्यात.</u>

उपरोक्त मान्यता नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय, तुकड्या सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांना <u>ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्षे झालेली नाहीत त्यांची ५ वर्षे पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रिडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल.</u> तसेच शासन निर्णयानूसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.

Desktop/Sachin Pawar 2012/Certificates.doc